रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

दिनांक : ३ जानेवारी २०२०

## मराठी विभाग

### क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती

आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर येथे मराठी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) च्या वतीने ३ जानेवारी २०२० रोजी 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती' निमित्त प्रा. राजेश पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख करून दिली. सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून फुले दांपत्याने केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. मुलींसाठी पहिली शाळा, बहुजन दीनदलितांसाठी घरचा पिण्याच्या पाण्याचा हौद खुला करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापणा करणे, यासारख्या त्यांच्या कार्याची चर्चा त्यांनी आपल्या मनोगतात केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या डॉ. मृणालिनी आहेर (प्रमुख, इंग्रजी विभाग) लाभल्या होत्या. त्यांनीही आपल्या मनोगतात आजच्या तरुण पिढीपुढील आव्हाने आणि सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्या कार्याची आवश्यकतेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. खाडे ए. एस. यांनी केले. आभार प्रा. सतीश मस्के यांनी मानले. तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी.ए. सोनार यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. के. बी. भोसले यांनी केले.

**निष्पत्ती (Outcome)**

- ❑ विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख पटली.

लाभार्थी संख्या : विद्यार्थी 70

अध्यापक व सेवक वर्ग : 15







प्रमुख
मराठी विभाग

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर मराठी विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)